सं.फौ.ख.क्रं.४१२/२०२४
सरकार –वि– दिलीप
नि.क्र.१० वर पुढे सुरु

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन आणि खऱ्या शिवाय काहीही सांगणार नाही.

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | रामकृष्ण धर्माजी आजबले, |
| वय सुमारे | : | ५३ वर्ष, व्यवसाय – पोलीस पाटील, |
| निवासस्थान | : | नवरगाव, तालुका :पवनी, जिल्हा: भंडारा. |

**<u>शपथेवर सरतपास</u> – <u>सहा</u>. <u>सरकारी वकील पी. आर. लिंगायत मॅडम यांच्यामार्फत</u>–**

१. पोलीसांनी मला पंचनाम्याच्या कार्यवाही करीता बोलविले होते. मला लेखी सूचनापत्र मिळाले होते. आता मला **निशाणी क्रमांक १३** वरील सूचनापत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पोलीसांनी माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून दारु जप्त केली होती. पोलीसांनी त्याबाबत पंचनामे तयार केले होते. आता मला **निशाणी क्रमांक १४** आणि **१५** वरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझया सहया असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे वकील व्ही. आर. मेश्राम साहेब यांच्या मार्फत –</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटील असल्यामुळे माझे नेहमी पोलीस ठाण्यात जाणे येणे असते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांच्या म्हणण्यानुसार मी सहया करतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ आणि जप्ती पंचनाम्यावर मी पोलीस ठाण्यात सहया केल्या. घटनेची तारीख मला माहित नाही. आरोपीच्या ताब्यातून मोहाफुलाची दारू जप्त करण्यात आली होती. किती दारू जप्त करण्यात आली होती हे मला माहित नाही. मी नवरगाव येथे राहतो. आरोपी चोवा येथे राहतो. चोवा ते नवरगाव मधील अंतर अडीच किलोमीटर आहे. मला शिंगाडे साहेबांचा फोन आला होता. शिंगाडे साहेबांचा फोन नंबर मला सांगता येणार नाही. पोलीसांसोबत माझे चांगले संबंध आहेत. मी किती सहया केल्या होत्या हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला. हे म्हणणे खरे नाही

की, पोलीसांच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| --- | --- |
| स्वा/- | स्वा/- |
| **(व्ही. आर. फरकुंडे)** | **(व्ही. आर. फरकुंडे)** |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२),पवनी. | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र. २)पवनी. |
| १३/०४/२०२६ | १३/०४/२०२६ |